क्र.पोउपा/वाहतुक/प्रशा-१/अधिसुचना/ ६८ /२०१६
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग यांचे कार्यालय,
ठाणे शहर. दि. १६ /०९/२०१६

**ठाणे शहर**

## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वाहनचालकांकडुन रस्त्यांवर कोठेही दुतर्फा पार्किग केली जात असल्याने रस्त्यावरील वाहतुकीस सतत अडथळा निर्माण होत आहे ; आणि,

ज्याअर्थी पार्किंग - नोपार्किंग बाबत निर्गमित करण्यात आलेल्या वाहतुक अधिसुचना या फार पुर्वी निर्गमित करण्यात आलेल्या असुन त्यावेळच्या वाहतुकीच्या तुलनेत सध्याच्या वाहतुकीत मोठया प्रमाणावर वाढ झाली असल्याने पार्किग बाबत यापुर्वी निश्चित केलेली ठिकाणी सध्या गैरसोईची ठरत आहेत ; आणि,

ज्याअर्थी अलिकडच्या कालावधीत ठाणे महानगरपालिकेच्या हद्दित नागरी संकुले, शाळा, कॉलेज, हॉस्पीटल इत्यादींच्या संख्येत झालेली वाढ , मोठया प्रमाणात उभी राहीलेली व्यापारी संकुले उदा. मॉल्स्, मल्टीप्लेक्स थिएटरस् इत्यादीमुळे येथे येणा-या वाहनांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे वाहन पार्किंगची गंभीर समस्या निर्माण झाली आहे; आणि,

ज्याअर्थी, अरुंद व कायम गर्दीचे रस्ते, उड्डाणपुलाच्या खालील मोकळी जागा, वर्दळीचे चौक व चौकाचा परीघ, शाळा तसेच रुग्णालयांचे प्रवेश व निकास मार्ग इत्यादी ठिकाणी वाहनचालकांकडुन असुरक्षितपणे वाहने पार्किंग करणेत येत असल्याने रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे ; आणि,

ज्याअर्थी, शहरातील मुख्य बाजारपेठा, रेल्वे स्थानक, बस स्थानक इत्यादीकडे जाणा-या मार्गावर सुरक्षित वाहनतळ उपलब्ध नसल्याने वाहनचालकांकडुन बेफिकीरपणे वाहने उभी केली जात असल्याने वाहन पार्किंगच्या जागा निश्चित करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली असल्याने ;

**त्याअर्थी,** मी, संदीप भा.पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७-०९-१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) व ११७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्याअनुषंगिक कर्तव्यार्थ खालीलप्रमाणे अधिसुचना निर्गमित करित आहे :-

ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सध्याची वाहतुकीची परिस्थिती व वाहन पार्किंग करिता उपलब्ध असलेली जागा इत्यादीचे सर्वेक्षण करुन, (१)ठराविक ठिकाणी पार्किग (Fixed parking) (२)सम-विषम पार्किंग (Odd - Even Parking) व (३) दुर्तफा पार्किंग (Both side Parking) याप्रमाणे वाहन पार्किंग जागेचे वर्गीकरण करणेत येऊन, या वर्गीकरणा प्रमाणे अरुंद व कायम गर्दीचे रस्ते वगळुन, उड्डाणपुल, चौक व चौकाचा परीघ वगळुन, शाळांच्या प्रवेश मार्गावर व रुग्णालयांचे प्रवेश व निकास मार्ग वगळुन तसेच मुख्य बाजारपेठेकडे जाणा-या व रेल्वे / बस स्टेशनकडे जाणा-या प्रत्येक मार्गावर सुरक्षित अंतरावर किमान एक तरी पार्किंग उपलब्ध होईल अशापध्दतीने दृष्टीक्षेप ठेवुन ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील उपलब्ध जागेनुसार खालील ठिकाणी वाहन पार्किंगकरिता जागा निर्धारित करण्यात येत आहेत :-

## ठाणेनगर ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | कुर्ला नागरीक सहकारी बॅंक लिमिटेड, ठाणे प. ते पारेख मेडीकल पर्यंत कोर्टनाक्याकडून जांभळी नाक्याकडे येणाऱ्या रस्त्यावर | पी–१, पी–२, (सम विषम पार्किंग) | अंतर अंदाजे १५० मीटर वाहनांची संख्या दुचाकी ७० ते ८० | ०९.०० ते २१.०० |
| २ | जीवन ज्योती रेडीमेड क्लॉथ स्टोअर्स ते अे वन फर्निचर | पी–१, पी–२, (सम विषम पार्किंग) | अंतर अंदाजे ३०० ते ३५० मीटर वाहनांची संख्या दुचाकी १२५ते१५० | ०९.०० ते २१.०० |
| ३ | जनता फॅशन कॉर्नर ते पटेल साडी सेंटर, बाजारपेठ रोड | पी–१, पी–२, (सम विषम पार्किंग) | अंतर अंदाजे २०० मीटर वाहनांची संख्या दुचाकी १०० ते १२५ | ०९.०० ते २१.०० |
| ४ | क्रिकनाक्याकडून सिडको कडे जाणारे रोडवर पारेख ट्रांन्सपोर्ट ते शहाजी गॅरेज गांवदेवी मंदीराचे समोर (खारटन रोड) | ठराविक ठिकाणी पार्कींग | अंतर अंदाजे १०० ते १५० मीटर, दुचाकी व चारचाकी वाहने अंदाजे २५ ते ३० | ०९.०० ते २१.०० |
| ५ | दादोजी कोंडदेव स्टेडीयमच्या समोरील गेट नं.१ व २ च्या समोरील येणाऱ्या जाणाऱ्या रोडवर | पी–१ पी–२ | अंतर अंदाजे १०० ते १५० मीटर, दुचाकी व चारचाकी वाहने अंदाजे १५ ते २० | ०९.०० ते २१.०० |

## कोपरी ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे पुर्व रेल्वे स्टेशन जवळ कोपरी वाहतुक पो.चौकी ते सुलभ शौचालय | ठराविक ठिकाणी पार्किंग | सुमारे ५० मीटर व फक्त दुचाकी वाहने | ०७.०० ते २२.०० |
| २ | दादा पाटील वाडी मार्ग, ठाणे<br>१) एटीएम सेंटर ते पोल क्र. ५/ए–२ दरम्याण कृष्णा बिल्डींग समोर<br>२) लक्ष्मी स्कुटर स्टॅन्ड ते अपोलो मेडीकल दरम्यान, त्रिमुर्ती बिल्डींग समोरील भागात | सम – विषम पार्कींग | अंदाजे ४० फुट व फक्त हलकी चारचाकी ०६ वाहने याकरिता | २४ तास |
| ३ | गोखले रोडवर यापुर्वी सकाळी ०७.०० ते १५.०० व १५.०० ते २३.०० असे सम – विषम पार्कींग आहे. ते तसेच नियमित ठेवणेत येत आहे. | | | |

## नौपाडा ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | गावदेवी मैदान | फिक्स पार्कींग | ठाणे रेल्वे स्थानकापासुन २०० मिटर अंतरावर | २४ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | राम मारूती रोडवरील समर्थ भांडार ते सोपान चौकापर्यंत | सम विषम पार्कींग | ५०० मीटर | २४ तास |
| ३ | वसंत हॉटेल ते भावना रेस्टॉरंट पर्यंत सेंट जॉन बॅप्टीस हायस्कुल चे पाठीमागील भागाचे भिंतीलगत (अहिल्यादेवी होळकर मार्ग) | एक दिशा पार्कींग | २५० मीटर | २४ तास |
| ४ | घंटाळी चौक (साईनाथ चौक) ते राम मारूती रोडवर (अपर्णा हॉटेल) | सम विषम पार्कींग | २०० मीटर | २४ तास |
| ५ | चरई जंक्शन ते टेंभीनाका एदलजी रोडकडे जाणारे मार्गावर | सम विषय पार्कींग | ३०० मीटर | २४ तास |
| ६ | चरई क्रॉस ते नुरीबाबा दर्गा रोडवर | सम विषम पार्कींग | १०० मीटर | २४ तास |
| ७ | नौका विहार ते दत्तमंदिर (डॉ.मुस रोड) | सम विषम पार्कींग | १०० मीटर | २४ तास |
| ८ | गडकरी रंगायतन ते एचडीएफसी बॅक डॉ.मुस रोड (तलावपाळी कडील बाजु) | वन साईड पार्कींग | १०० मीटर | २४ तास |
| ९ | जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग टि. एम.सी. समोरील गणपती मंदिर गेट पासुन स्पुर्ती व्यायामशाळा समोरील तलाव कडील बाजु | एक दिशा पार्कींग (तलावाकडील बाजु) | १०० मीटर | २४ तास |
| १० | बॅक ऑफ महाराष्ट्र ते जनरल अरूण कुमार वैद्य चौक | जंक्शन पासुन २० मीटर अंतरापासुन एक दिशा पार्कींग | ५० मीटर | २४ तास |
| ११ | साई कृपा हॉटेल ते न्यु इंग्लिश स्कुल | पी–१ पी–२ | ७० मीटर | २४ तास |
| १२ | आराधना ते तिन पेट्रोलपंप एलबीएस रोडवर | रस्त्याचे डावे बाजुस पार्कींग | १०० मिटर | २४ तास |
| १३ | घंटाळी रोड (घंटाळी चौक ते सावरकर रोड क्रॉस) | पी–१ पी–२ | २०० मीटर | २४ तास |
| १४ | बाजी प्रभु देशपांडे मार्ग (गणपती कारखाना ते साईनाथ चौक) | पी–१ पी–२ | २०० मीटर | २४ तास |
| १५ | दगडी शाळा ते मालती हॉस्पीटल गोविंद बच्छाजी रोड | डावे बाजुस पार्कींग | ३०० मीटर | २४ तास |
| १६ | संभाजी पथ | पी–१ पी–२ | ३०० मीटर | २४ तास |
| १७ | महात्मा फुले मार्ग (गोखले रोड) जंक्शन ते सत्यम कलेक्शन) | पी–१ पी–२ | १५० मीटर | ——— |
| १८ | सर्विस रोड तिनहात नाका ते कॅडबरी (हायवेकडील बाजुस नो पार्कींग) | एक दिशा पार्कींग | १.५ कि.मी. | २४ तास |
| १९ | भक्ती मंदिर मार्ग | पी–१ पी–२ | २०० मीटर | २४ तास |
| २० | हॉलीवुड ऑप्टिशीयन ते ओपन हाऊस, मिनाताई ठाकरे मार्ग | पी–१ पी–२ | १५० मीटर | २४ तास |
| २१ | म्दनलाल धिंग्रा मार्ग, आराधना जंक्शन ते बॅक ऑफ महाराष्ट्र | दुतर्फा पार्कींग | | २४ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | अल्मेडा जंक्शन ते नितीन जंक्शन पासुन ५० मीटर अंतर सोडुन | दुतर्फा पार्कींग | ४०० मीटर | २४ तास |
| २३ | तिनहात नाका ते आराधना जंक्शन पासुन २० मीटर अंतर सोडुन | दुतर्फा पार्कींग | ३०० मीटर | २४ तास |
| २४ | मालवण तडका ते खोपट जंक्शन | दुतर्फा पार्कींग | १५० मीटर | २४ तास |
| २५ | चंदीवाला कॉम्लेक्स रोड | दुतर्फा पार्कींग | ४०० मीटर | २४ तास |
| २६ | पाटील वाडी रोड, शहिद उदयान ते सिध्देश्वर हाईट्स | दुतर्फा पार्कींग | १५० मीटर | २४ तास |
| २७ | धरमविर मार्ग सविस रोड जंक्शन ते परमार्थ निकेतन चौक | दुतर्फा पार्कींग | ३०० मीटर | २४ तास |
| २८ | राम गणेश गडकरी रोडवर नोवा विनीयर दुकानाचे समोरील बाजुस घंटाळी साईनाथ चौकापर्यंत | एक दिशा पार्कींग | सुमारे २०० मिटर अंतर सार्वजनिक रोडवर | २४ तास |
| २९ | बाजी प्रभु देशपांडे मार्गावर पी–१ पी–२ प्रमाणे पार्कींग व्यवस्था | एक दिशा पार्कींग | बाजी प्रभु देशपांडे मार्गावर | २४ तास |

**वागळे ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र**

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | रेमण्ड रिटेल शॉप | ठरावीक ठिकाणी पार्कींग | ५० मीटर १० वाहने | १२.०० ते १५.०० |
| २ | इराणी बागेचे गेटच्या जवळ | ठरावीक ठिकाणी पार्कींग | ३० मीटर १० वाहने | १२.०० ते १५.०० |

**कापुरबावडी ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र**

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | कॅडबरी जंक्शन ते माजीवडा जंक्शन येथे हायवेच्या विरूध्द बाजुस फुटपाथ लगत | ठराविक पार्किंग | अंदाजे १ कि.मी. चारचाकी हलकी वाहने | २४ तास |
| २ | ज्युपीटर क्रॉस ते रविस्टील नाका येथे सर्व्हिस रोडवर हायवेच्या विरूध्द बाजुला फुटपाथ लगत पार्कींग | ठराविक पार्किंग | अंदाजे ६०० मी. चारचाकी हलकी वाहने | २४ तास |
| ३ | हायलॅण्ड जंक्शन ते बाळकुम (फायर ब्रिगेड लगतचा सव्हिस रोड) येथे सर्व्हिस रोडवर हायवेच्या विरूध्द बाजुला कंम्पाऊंड लगत | ठराविक पार्किंग | अंदाजे १ कि.मी. चारचाकी हलकी वाहने | २४ तास |
| ४ | तत्वज्ञान सिग्नल ते पेट्रोल पंप (सत्कार हॉटेल) सर्व्हिस रोडवर हायवेच्या विरूध्द बाजुला कंम्पाऊंड लगत पार्कींग | ठराविक पार्किंग | अंदाजे १ कि.मी. चारचाकी हलकी वाहने | २४ तास |
| ५ | तत्वज्ञान सिग्नल ते सिनेवंडर सर्व्हिस रोडवर हायवेच्या विरूध्द बाजुला कंम्पाऊंड लगत पार्कींग | ठराविक पार्किंग | अंदाजे ४०० मी. चारचाकी हलकी वाहने | २४ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | संकल्प हाईटस् इमारती लगत, रूणवालनगर समोरील रस्ता | सम/विषम पार्कीग | अंदाजे २०० मी. चारचाकी हलकी वाहने | २४ तास |
| ७ | ज्युपीटर हॉस्पीटल लगत, ठाणे मनपाच्या कचरा गाडयांकरीता असलेल्या पार्किंगचा काही भाग | — | हलकी व जड/अवजड वाहने | २४ तास |

**कासारवडवली ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र**

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | बोरी मस्जिद डिमार्ट जव कोलशेत रोड ते एमसीजीएम वॉटर सप्लाय गेट कापुरबावडी जाणारे वाहीनीचे बाजुस मुख्य चौकपासुन ५० मीटर आंब | ठराविक ठिकाणी पार्किंग | सुमारे ५०० मीटर चारचाकी ६० व दुचाकी १३० | सकाळी ८.०० ते रात्रौ २२.०० वाजजेपावेतो |
| २ | ब्रम्हांड फेज ४ ते रुतु टॉवर — सोसायटी गेट पासुन २० मीटर लांब व चौकापासुन २० मीटर लांब | ठराविक ठिकाणी पार्किंग | सुमारे ८०० मीटर चारचाकी १२० दुचाकी १३० | सकाळी ०८.०० ते रात्रौ २२.०० पर्यंत |
| ३ | मानपाडा जंक्शनपासुन हॅप्पी व्हॅली चौकाकडे जाणारे रोडवर मुख्य चौकापासुन ५० मीटर लांब | ठराविक ठिकाणी पार्किंग | सुमारे ४५० मीटर चारचाकी ६० दुचाकी १०० | सकाळी ०८.०० ते सायंकाळी १७.०० पर्यंत |
| ४ | रिजेन्सी टॉवर ते ओमकारेश्वर सोसायटी कावेसर यादरम्यानच्या रोडवर मुख्य चौकापासुन ५० मीटर लांब | दुतर्फा पार्किंग | सुमारे ४०० मीटर चारचाकी ६० दुचाकी ६५ | सकाळी ०८.०० ते रात्रौ २२.०० पर्यंत |

**राबोडी ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र**

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | खोपट सिग्नलच्या ५० मीटर अंतरावर ते आंबेडकर रोड | सम विषम पार्किंग | ५० मीटर | २४ तास |

**कळवा ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र**

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | कळवा रेल्वे स्टेशन पश्चिम समोर रेल्वे विभाग | फिक्स पार्कींग | १००० चौ.मीटर | २४ तास |

**मुंब्रा ट्रॅफिक युनिट कार्यक्षेत्र**

| अ. क्र. | पार्किंगचे ठिकाण | पार्किंगचा प्रकार | पार्किंगचे अंतर व वाहन संख्या | पार्किंगच्या वेळा |
|---|---|---|---|---|
| १ | मुंब्रा रेल्वे स्टेशन एम गेटच्या बाजुस असेल्या मोकळया जागेत (मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत) | फिक्स पार्कींग | सुमार १०० दुचाकी व ४० चारचाकी | दिवसा |
| २ | कौसा कब्रस्थान ते दर्गा रोड | पी—१ पी—२ | सुमारे १०० मीटर | सायंकाळी |

सदरची अधिसुचना दिनांक १९-०९-२०१६ पासुन तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. या संदर्भातील यापुर्वीच्या सर्व अधिसुचना या अधिसुचनेव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. या कालावधित काही सुचना / आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात पोलीस उपायुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.रोड, ठाणे (पश्चिम) येथे कळवावेत. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन तिमाहित काही सुचना वा आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढे सदरची अधिसुचना कायमस्वरुपी अंमलात राहील.

(संदीप भा.पालवे)
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दि अधिकारी, ठाणे
२/- या अधिसुचनेची प्रसिध्दि करणेस आपणास विनंती करणेत येत आहे.

प्रत मा.सविनय सादर :-
१.मा.पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर
२.मा.पोलीस सह आयुक्त सो, ठाणे शहर.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर
मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी वाहन पार्किंग फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत कार्यवाहीस्तव
१. सपोआ.वाहतुक उपविभाग, ठाणे.
२.प्रभारी अधिकारी, ठाणेनगर, नौपाडा, कोपरी, वागळेईस्टेट, कापुरबावडी, कासारवडवली, राबोडी, कळवा, मुंब्रा.

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, ठाणे.
२/- कृपया सदरची अधिसुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर.
२/- त्यांनी याबाबतची प्रसिध्दि ई पोलीस पत्रकात द्यावी.